संपादकीय

# एप्रिल पासूनच सुरवात करा !

सहकाराचे २००८ - २००९ हे आर्थिक वर्ष ३१ मार्च २००९ रोजी संपले. १ एप्रिल .२००९ पासून २००९ - २०१० हे सहकाराचे आर्थिक वर्ष सुरू झाले. २००८ - ०९ या आर्थिक वर्षासाठीचे सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण १५ मे २००९ नंतर केव्हाही सुरू होईल. आणि पतसंस्थांचे लेखापरिक्षण होताना अनेक गोष्टी प्रत्येक पतसंस्थेच्या लक्षात येतील.

राज्याच्या मा. सहकार आयुक्तांच्या आदेशानुसार २००८ - ०९ या सहकारी आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षण करीत असताना २०० गुण विविध मुद्यांसाठी निश्चित केलेले होते. आणि त्याच आधारे पतसंस्थांचे लेखापरिक्षण करावयाचे झाल्यास एप्रिल २००९ हाच महिना शुभारंभाचा असेल यासाठी, आजच्या अग्रलेखाचा हेतु आहे.

पतसंस्थांमधील ठेवी व भाग - भांडवलातील वाढ हा महत्वाचा मुद्दा पतसंस्थांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी अग्रस्थानी ठेवला पाहिजे, आणि त्याच बरोबर थकबाकी वसुली सुध्दा एप्रिल २००९ पासूनच केंद्रीत करायला पाहिजे. यासाठी संपुर्ण १२ महिन्यांच्या कार्यक्रमाची सरासरी काढून प्रत्येक महिन्यास ठेव, भाग - भांडवलामध्ये वाढ करणेसाठी उद्दिष्ठ निश्चित करायला पाहिजे. व त्या - त्या महिन्यात त्याची पूर्तता सुध्दा केली पाहिजे.

३१ मार्च २००९ अखेरची झालेली थकबाकी व एप्रिल पासून नवीन वाटलेले कर्जाची थकबाकी होऊ नये म्हणून कालबध्द कार्यक्रम आखून त्याची सुरवात एप्रिल महिन्यापासूनच करणे आवश्यक आहे. एकदा थकबाकीचे प्रमाण कमी झाले तर नफा निश्चितपणे होईल आणि त्यामुळे एन. पी. ए. साठी करावी लागणारी तरतुद अत्यल्प राहील व त्याचा थेट परिणाम नफा रकमेवर होईल आणि अनुषंगाने सी. डी. रेशो याचे निश्चितपणे नियोजन होईल.

एप्रिल २००९ या महिन्यापासूनच सी. डी. रेशो, पतसंस्था नफ्यात ठेवणे, नवीन कर्जाची थकबाकी होऊ न देणे व मागील थकबाकीची रक्कम वसुलीसाठी कार्यक्रम आखणे, यामुळे सन २००९ - १० हे सहकारी आर्थिक वर्ष प्रत्येक पतसंस्थेस वरदान ठरू शकेल. शिवाय बाहेरून कर्ज उभारण्याची मर्यादा कुठल्याही परिस्थितीत, कुठल्याही महिन्यात वाढणार नाही याची प्रत्येक पतसंस्थेने दक्षता घेणे आवश्यक आहे. अन्यथा विविध अडचणींना पतसंस्थांना सामोरे जावे लागेल.

मुदत संपणाऱ्या ठेवींचा कालबध्द तक्ता प्रत्येक पतसंस्थेने रकमेसहित बनविला पाहिजे, आणि त्या - त्या तारखेस त्या ठेवी परत करून जिल्हा बँकेत तरलतेसाठी ( लिक्वीडीटी) रक्कम गुंतवुन पतसंस्थेचा आर्थिक कणा मजबुत करण्यासाठी एप्रिल महिन्यातच सुरवात केली पाहिजे. कायद्याप्रमाणे देय शिक्षण निधीचा भरणा महाराष्ट्र राज्य सहकारी संघाला मागील थकबाकीसह अदा केला पाहिजे.

ह्या आर्थिक वर्षामध्ये पतसंस्थेची कामकाजाची वेळ, कर्मचारी संख्या व कार्यालयीन दैनंदीन खर्च याचा

निश्चित कार्यक्रम एप्रिलमध्येच पूर्णपणे आखला पाहिजे की ज्याचा समावेश वार्षिक अहवालात नवीन आर्थिक वर्षाचे ५ महिने संपल्यानंतर आपण करतो. त्यामुळे उर्वरीत ७ महिन्यामध्ये १२ महिन्यांचे नियम व कायद्याप्रमाणे कामकाज करणे व उद्दिष्टपुर्ती करणे शक्य होत नाही.

पतसंस्थेतील कर्मचारी व संचालक, पदाधिकारी यांना द्यावयाच्या शिक्षण - प्रशिक्षणा संदर्भात आपला कार्यक्रम एप्रिल महिन्यामध्ये निश्चित करायला पाहिजे आणि सामाजिक बांधिलकी म्हणून करावयाच्या कार्यक्रमांची रूपरेषा एप्रिलमध्ये आखणे आवश्यक आहे.

एकंदरीत सन २००९ - १० या सहकाराच्या आर्थिक वर्षात यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी व विविध उद्दीष्ठे पूर्ण करण्यासाठी एप्रिल २००९ हाच महिना नियोजनाचा आहे . हे आपल्या लक्षात आणून देण्यात येत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**